कोकणसाद
www.kokansad.com
मंगळवार, दि. १० जानेवारी २०२३

# जांभेकरांचे समाजहितासाठी मोठे योगदान

## सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक विवेकानंद नाईक यांचे प्रतिपादन

## दोडामार्ग-हळबे महाविद्यालयात पत्रकार दिन साजरा

कोकणसाद वृत्तसेवा

**दोडामार्गः** मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी समाज हितासाठी खूप मोठे योगदान दिले आहे. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून वृत्तपत्रसृष्टीत काम केल्यास सामाजिक विकास होण्यास नक्कीच मदत होईल आणि आज याच बाळशास्त्रींचा हा पत्रकारितेचा वारसा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पत्रकार पुढे नेत आहेत, ही गोष्ट अभिमानास्पद आहे, असे मत विवेकानंद नाईक यांनी व्यक्त केले.

दोडामार्ग येथील हळबे महाविद्यालयात दोडामार्ग तालुका पत्रकार समितीतर्फे पत्रकार दिन साजरा करण्यात आला. यावेळी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरवात करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक विवेकानंद नाईक, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सुहास देसाई, पत्रकार समितीचे माजी तालुकाध्यक्ष व माजी जिल्हा कार्यकारणी सदस्य संदीप देसाई, सचिव महेश लोंढे आदी उपस्थित होते. यावेळी पत्रकार दिनाचे औचित्य साधून सर्व पत्रकारांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन हळबे कॉलेजच्यावतीने सन्मानित करण्यात आले. यावेळी संदीप देसाई, सुहास देसाई, डॉ.सुभाष सावंत या मान्यवरांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रज्ञाकुमार गाथाडे, तर आभार प्रा. संजय खडपकर यांनी मानले.



आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना विवेकानंद नाईक, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, सुहास देसाई, संदीप देसाई, व अन्य.